म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक [illegible]

ग्रंथालय क्रमांक २८८

पुस्तकाचें नांव टार्लटन पक्षपुष्प.

सन

पक्ष-पुष्प.

सं-का-८८

मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणे सन १९

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणे सन १८

... ग्रंथ संग्रहालय.

टाल्टन अथवा पक्ष-पुष्प.

मराया एजवर्थकृत "मॉरलटेल्स" यांपैकीं एका गोष्टीचें भाषांतर.

विनायक दत्तात्रय भिलवडीकर

यांनीं केलें तें

सी. एच. क्यांडी, बी. ए., एलएल. एम.

प्रिन्सिपाल, राजाराम कॉलेज, कोल्हापूर,

मुंबई युनिव्हरसिटीचे फेलो

यांनीं

प्रसिद्ध केलें.

कोल्हापूर एथें मिशन छापखान्यांत छापिलें.
१८९२

किंमत ४ आणे.

PREFACE

When I edited, 3 years ago, the 'Chhote Vyàpari' or Marathi version of Miss Edgeworth's "Little Merchants," I expressed the hope that others would set to work and produce some books of fiction suitable for school boys. I am glad to say that one of my pupils, Vinayak Dattatraya Bhilavadikar has now prepared this Marathi translation of 'Tarlton' another of the 'Moral Tales;' and I have much pleasure in recommending it to the notice of all the teachers and School boys of Maharashtra.

Kolhapur,
November 1892.

C. H. CANDY.

७८

प्रस्तावना.

तीन वर्षांपूर्वी, जेव्हां मी **मराया एजवर्थकृत लिटल मरचंट्स** नांवाच्या गोष्टीचें **छोटे व्यापारी** नामक मराठी भाषांतर छापून प्रसिद्ध केलें, त्याच वेळीं अशी इच्छा प्रदर्शित केली होती कीं, दुसरे कोणी तरी हें काम हातांत घेऊन, विद्यार्थ्यांना वाचण्यास योग्य अशीं कांहीं काल्पित गोष्टीचीं पुस्तकें लिहितील. प्रस्तुत पुस्तक, **मराया एजवर्थकृत** नीतिबोधक गोष्टींपैकीं **टार्लटन** नामक दुसऱ्या एका गोष्टीचें भाषांतर असून, तें माझा एक विद्यार्थी, **विनायक दत्तात्रय भिलवडीकर,** यानें तयार केलें आहे, हें सांगण्यास मला विशेष आनंद वाटतो. व **महाराष्ट्र** देशांतील प्रत्येक शिक्षक व विद्यार्थी यांनीं हें पुस्तक वाचावेंच अशी मी आनंदानें शिफारस करितों.

कोल्हापूर,
नोवेंबर १८९२.

सी. एच्. क्यांडी,
प्रिन्सिपॉल ऑफ् दि
राजाराम कॉलेज.

हें पुस्तक मूळ पुस्तकाचें शब्दशः भाषांतर असल्यामुळें, तें तपासण्याचे कामीं माझे प्रिय गुरुजी, **बाजीराव विष्णु खांडेकर, बी. ए.,** व **नारायण गोविंद करंदीकर, अ. राजाराम हायस्कूल,** यांनीं अतिशय तसदी घेतली व जागोजागीं योग्य सूचना केल्या, यामुळें त्यांचे आभार मानण्याची ही संधि मी फुकट दवडीत नाहीं.

वि. द. भि.

टार्लटन अथवा पक्ष-पुष्प.

आमच्या खेड्यांतील एका शाळेंत, फ्रीमन नामक उत्तम गुरूच्या हाताखालीं, हार्डी नांवाचा एक तरुण मुलगा शिकून तयार झाला होता. तो प्रामाणिक, आज्ञाधारक, चपल व सुशील होता, ह्मणून त्याचे गुरुजी त्याला फार चाहत असत; व त्याच्या सोबत्यांपैकीं सुशील ह्मणून जे जे होते, त्या सर्वांचा तो आवडता असल्यानें, वाईट मुलांनीं आपणावर प्रीति करावी, अशी त्याची इच्छा नव्हती; आणि आळशी, खोड-कर किंवा अप्रामाणिक मुलें जेव्हां त्याला त्रास देत किंवा त्याची थट्टा करून हांसत, तेव्हां तो चिडत नसे किंवा खिज-तही नसे. त्याचा मित्र लव्हिट याची गोष्ट अगदीं निराळी होती. सर्वांना आपण आवडत असावें, अशी त्याची इच्छा असून, शाळेमध्यें अत्यंत सुशील ह्मणवून घ्यावें, अशी त्याला मोठी हौस असे—आणि तो तसा होताही. त्याला नेहमीं 'गरीब लव्हिट' या नांवानें हाक मारीत. त्याची फजिती झाली, ह्मणजे प्रत्येकाला त्याची कींव येई. असे फजितीचे प्रसंग वारंवार येत; कारण, जरी तो सुस्वभावाचा होता तरी ज्या गोष्टी आपण करणार, त्या चुकीच्या आहेत असें सम-जूनही, तो त्या करण्यास प्रवृत्त होई; कारण, दुःशील लोकांचें मन दुखविण्याची त्यास भीति वाटे, व मूर्ख लोक आपली टर उडवितील, ह्मणून त्याची ना ह्मणण्याची छातीच होत नसे.

शरदृतूमध्यें एके दिवशीं संध्याकाळीं सर्व मुलांना पाठशाळेजवळच एका रमणीय हिरव्याचार कुरणामध्यें खेळावयास जाण्याची परवानगी मिळाली. लव्हिट व टार्लेटन नांवाचा दुसरा एक मुलगा, हे उभयतां *बॅटलडोअर व *शटल्कॉक नांवाचा खेळ खेळूं लागले; व बाकीच्या मुलांचा मोठा जमाव, जवळच तो खेळ पहाण्याकरितां उभा होता. कारण, त्या शाळेमध्यें हा खेळ खेळणारे पटाईत ह्मटले ह्मणजे ते दोघेच होते. आणि ही त्यांच्या कसबाच्या परीक्षेचीच वेळ होती. जेव्हां खंड्यांची संख्या तीनशें विसापर्यंत येऊन ठेपली, तेव्हां सर्वांचें चित्त त्या खेळाकडे फार वेधलें. त्या गड्यांचे हात इतके दमून गेले कीं, त्यांच्यानें पुढें बॅट पेलवेना. तें फूल हवेंत उडूं लागलें. इतक्यांत तें जमिनीवर पडतेसें वाटे, तोंच तें खेळणाऱ्यांच्या डोकीवर उंच उडत जाई, हें पाहून प्रेक्षक लोक फारच चकित होऊन जात. तथापि उत्तरोत्तर त्या फुलाला तडाके हळूहळू बसूं लागले; आणि चहूंकडून "वाहवा लव्हिट" "वाहवा टार्लेटन" असा एकच गजर होऊं लागला. एक क्षणभर कोण जिंकितो हें कळेना; परंतु सरतेशेवटीं, मावळणाऱ्या सूर्याचा प्रकाश लव्हिटच्या तोंडावर सपाटून पडल्यामुळें, त्याचे डोळे इतके दिपून गेले कीं, त्याला तें फूल दिसलें नाहीं; व त्यामुळें तें त्याच्या पायाशीं येऊन पडलें.

"टार्लेटननें खेळ जिंकला" असा पहिला गजर झाल्यानंतर जो तो मोठ्यानें ओरडून ह्मणाला, "बिचारा लव्हिट!

* या खेळांत जें फूल लागतें तें पक्ष्यांच्या पिसांचें असतें. ह्मणून याला मराठींत पक्षपुष्प ह्म. पंखांचें फूल अशी संज्ञा दिली आहे.

तो इतका सुस्वभावाचा मुलगा आहे कीं, असा दुसरा मुलगाच नाहीं. सूर्याकडे पाठ करून तो उभा राहिला नाहीं, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे बरें!!"

टार्लटन फुशारकीनें ओरडून ह्मणाला, "हंः चला, या. छाती असेल तर, सर्वच जण या मजबरोबर दुसरा खेळ खेळायला." असें बोलून त्यानें तें फूल आपल्या हातून होईल तितक्या जोरानें वर उडविलें—इतक्या जोरानें कीं, तें कुंपणावरून उडून, शेताला लागूनच एक गल्ली होती, तींत जाऊन पडलें. टार्लटन ह्मणाला, "अरे बापरे!! आतां काय करावें बोआ?"

त्या मुलांना त्या गल्लींत जाण्याची अगदीं मनाई होती. आणि तुह्मी सांगतां त्याप्रमाणें आह्मी त्या गल्लींत जाणार नाहीं, असें जेव्हां मुलांनीं ह्मटलें, तेव्हांच त्यांना त्या जवळच्या शेतांत खेळूं दिलें होतें.

दुसरें फूल जवळ नव्हतें, ह्मणून त्यांचा खेळ तसाच राहिला. ते त्या बांधावर उभे राहून कुंपणावरून पलीकडे डोकावून पाहूं लागले. टार्लटन ह्मणाला, "तें पहा फूल मला पलीकडे दिसतें. जर कोणी तें घेऊन येईल, तर बरें होईल. (ल्व्हिटकडे पाहून) शेताच्या खालच्या बाजूस जें फाटक आहे, त्यावरून जाऊन कोण पाहिजेल तो तें घेऊन अर्ध्या मिनिटांत परत येईल." ल्व्हिट कुरकुरत ह्मणाला, "परंतु आपणांस त्या गल्लींत जावयाची मनाई आहे, हें तुला ठाऊक आहे ना?"

टार्लटन ह्मणाला, "अंः कां रे? आतां गेलें ह्मणून काय हरकत आहे?" आपलें बॅट हातानें वाजवीत वाजवीत ल्व्हिट

ह्मणाला, "आपल्याला नाहीं बोआ ठाऊक! पण—" "तुला माहीत नाहीं तर मर्दा! मी असें विचारितों कीं तूं भितोस रे कशाला?" असें टार्लटननें विचारिलें.

लव्हिटचा नूर पालटला. तो आपलें बॅट वाजवीत वाजवीत पुनः हळूच ह्मणाला, "आपल्याला नाहीं बोआ कळत." परंतु "मी विचारितों कीं तुला कशाची रे भीति वाटते?" हे शब्द टार्लटननें अंमळ उद्धटपणानें पुनः उच्चारितांच त्यानें एकदम बॅट वाजवावयाचें सोडिलें, व आजूबाजूस पाहून ह्मटलें, "आपण कशालाही डरत नाहीं बोआ!!"

हार्डी पुढें सरसावून ह्मणाला, "होय, परंतु तूं भितोस."

ल.—काय मी? सांग पाहू मला कशाची भीति वाटते ती!!

हा.—वाईट गोष्ट करण्याची.

"वाईट गोष्ट करण्याची" असें पुन्हा आपण ह्मणून टार्लटननें त्याला वेडावून दाखविलें; त्याच्या योगानें जो-तो खदखदां हांसूं लागला. "पाठीचें धिरडें निवेल ह्मणून भीति वाटते असें ह्मटलें असतें, तर शोभलें; नसतें काय?" हंशा कांहींसा कमी झाल्यावर हार्डी शांतपणानें ह्मणाला, "छेः टार्लटना, तूं जितका माराला भीत नाहींस, तितकाच मीही भीत नाहीं. परंतु माझ्या मनांत—" "तुझ्या मनांत कांहीं असलें तरी हरकत नाहीं; परंतु तूं आपलें शहाणपण व मनांतले हेतु दाखवून उगीच कां मध्यें तोंड घालतोस? आमच्याकरितां एक पाऊल तरी पुढें टाक, असें तुला सांगण्याचें कोणाच्या मनांतही आलें नाहीं. आह्मीं फक्त लव्हिटला

सांगितलें होतें. कारण तो फार उत्तम मुलगा आहे." हार्डी ह्मणाला, "आणि ह्मणूनच तुह्मी त्याला कांहीं सांगूं नये. तुह्मांला माहीत आहेच कीं, त्याच्याकडून कधीं ना यावयाचेंच नाहीं." लव्हिटला त्याचा अभिमान वाटून तो ह्मणाला, "हें तर खरेंच. पण तूं एथें चुकतोस; कारण मला वाटलें तर मला नाहींही ह्मणतां येईल."

हार्डीला हंसूं आलें. हार्डीला आपला तिरस्कार येईल कीं काय, व टार्लटन आपली टर उडवील कीं काय, याची लव्हिटला दहशत वाटून तो साशंक उभा राहिला. पुनः आपलें बॅट घेऊन त्यानें तें चमत्कारिक रीतीनें आपल्या तर्जनीच्या शेंड्यावर तोलून धरिलें. टार्लटन ओरडून ह्मणाला, "पहा, आतां पहाच त्याच्याकडे!! असला मूर्ख मनुष्य तुह्मीं कधीं तरी आजन्मांत पाहिला आहे काय? तो अगदीं हार्डीच्या ताटाखालचें मांजर आहे. पार्सन प्रिग हा केवळ त्याला कर्दनकाळ वाटून तो त्याला इतका भितो कीं, प्राण गेला तरी बेहत्तर पण त्याच्यानें इकडे तिकडे ह्मणून बिलकूल पहावतच नाहीं. एकसारखी त्याची नासिकाग्र दृष्टि आहे. पहा तो कसा वांकड्या दृष्टीनें पहातो आहे!!" लव्हिट वर पाहून ह्मणाला, "मी वांकड्या दृष्टीनें पहात नाहीं, व मी कोणाच्या कह्यांतही नाहीं. हार्डी जें कांहीं बोलला, तें फक्त माझी फजिती होऊं नये ह्मणूनच बोलला. तो माझा अतिशय जिवलग मित्र आहे."

लव्हिट हें नेहमींपेक्षां अधिक अवसानानें बोलला. कारण ही गोष्ट त्याच्या मनाला व थोरपणाला लागण्यासारखीच होती. हार्डी त्याचा हात धरून ममतेनें ह्मणाला, "चल,

तर मग जाऊं या आतां." तो निघाला इतक्यांत टार्लेटन ह्मणाला, "जा बरें, जा, आपल्या जिवलग मित्राबरोबर जा. पण खबरदार केव्हां तरी एखाद्या कचाट्यामध्यें येशील बरें कां!! सलाम छोटे पेनेडो साहेब!!" लव्हिट घाईनें मागें वळून ह्मणाला, "कोणाला रे ते छोटे पेनेडो साहेब ह्मणताहेत?" हार्डी ह्मणाला, "तिकडे तूं लक्षच देऊं नको. ह्मणूं दे त्यांना. त्यांत काय अर्थ आहे?" लव्हिट ह्मणाला, "त्यांत अर्थ तर कांहीं नाहीं खराच; परंतु छोटा पेनेडो ह्मणवून घेणें कोणालाही आवडत नाहीं." आणखी कांहीं पावलें पुढें गेल्यानंतर पुनः तो ह्मणाला, "शिवाय, माझें हें वर्त्तन वाईट स्वभावाचें आहे असें त्यांना वाटेल. मला वाटतें, आपण परत जाऊन त्यांना असेंच सांगावें कीं, तें तुमचें फूल माझ्यानें आणवत नाहीं, ह्मणून मला फार वाईट वाटतें तें. चलच माझ्याबरोबर परत." हार्डी ह्मणाला, "नाहीं. आतां नाहीं बोआ आपण येणार; व तूंही पण न जाशील तर बरें." लव्हिट ह्मणाला, "परंतु अमळ थांब. मी तेथें खचित एक मिनिटभर देखील रहात नाहीं." असें ह्मणून आपण छोटा पेनेडो नाहीं, अशी खात्री करण्याकरितां तो माघारा गेला.

एकदां परत गेल्यानंतर पुढें जें काय व्हावयाचें, तें ओघानेंच घडून आलें. कारण आपण सुस्वभावाचे आहों, याच्या पुष्टिकरणार्थ त्याला आपल्या मित्रांच्या विनवणीला हार जावें लागलें. आपला थोरपणा दाखविण्याकरितां त्यानें त्या फांटकावरून पलीकडे उडी मारिली, व इकडे त्या छोट्या समुदायामध्यें टाळ्यांचा गजर होतच होता:—व तो बोलतां बोलतां दिसेनासा झाला.

सुमारें पांच मिनिटांनीं दम लागलेला असा लव्हिट परत येऊन ह्मणाला, "हें बघ, तें फूल मी आणिलें." तो धापा टाकीत टाकीत आणखी ह्मणाला, "आणखी मी जें कांहीं पाहिलें तें सांगतों." जो तो मोठ्या उत्कंठेनें विचारूं लागला, "कायरे काय तें?" "त्या गल्लीच्या शेवटाला एक कोंपरा आहे, त्याच्या वळणाच्या तेथेंच–" इतकें बोलून तो दम घेऊं लागला. टार्लटनला दम कोठें होता? तो ह्मणाला, "हं, सांग पुढें." लव्हिट ह्मणाला, "अरे पण मला जरा दम तरी घेऊं दे." टार्लटन ह्मणाला, "अं: दम कसला घेतोसरे?" लव्हिट पुढें सांगूं लागला, "त्या गल्लीच्या शेवटाला एक कोंपरा आहे, त्याच्या वळणाच्या तेथें मी तें फूल हुडकीत असतां, माझ्याजवळच आसपास मोठा सळसळ आवाज मला ऐकूं आला. ह्मणून तो कोठून येतो, हें मी पाहूं लागलों. पहातों तों त्या रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस, एका लहानशा शानदार बागेंत, एक साधारण टार्लटन एवढाच मोठा मुलगा, एका मोठ्या वृक्षावर बसून त्याच्या फांद्या हालवीत आहे असें पाहिलें. मी त्या मुलाजवळ एक फळ मागितलें. तो ह्मणाला 'मला तुला एक फळसुद्धां देतां येत नाहीं. कारण हीं माझ्या आजोबाचीं आहेत.' तत्क्षणींच एका 'गूजबेरी'च्या झुडपामागून त्याच्या चुलत्यानें आपलें डोकें वर काढून पाहिलें. व त्याच्या त्या आजोबानेंही आपलें डोकें खिडकींतून बाहेर काढिलें; ह्मणून अखेरपर्यंत तो माझ्यामागें सर्व रस्ताभर हांका मारीत आहे, असें जरी मला ऐकूं येत होतें, तरी होईल तितकें जलद पाऊल टाकून मी तेथून धूम ठोकिली.

टार्लेटन ह्मणाला, "करूं दे शंख त्याला. त्याला उगीच पांचजन्य करावयाला लावावयाचा नाहीं. आज रात्रीं निजावयाच्या अगोदर, त्याच्या बागेंतील सुरेख, मोठमोठालीं, गुलाबी ॲपल फळें कांहीं तरी आणावयाचींच, असा आपला तर संकल्प ठरला बोआ."

या भाषणासरसे सर्व जण अगदीं गप्प बसले. लव्हिट शिवाय जो तो टार्लेटनकडे पाहूं लागला. जणूं काय आपली मजल झाली यापेक्षांही पुढें अधिक मजल मारावी लागेल, या भीतीनें लव्हिट खालीं पाहत होता. तो आपल्याशींच ह्मणाला, "खरेंच. हार्डीनें सांगितल्याप्रमाणें मीं परत आलों नसतों तर फार चांगलें झालें असतें."

हा गोंधळ झालेला पाहूनही टार्लेटननें बेफिकीरपणानें आपलें बोलणें पुढें चालविलें. तो ह्मणाला "बरें, पण अधिक कांहीं बोलण्याचे पूर्वीं आपल्यांत कोणी हेर नसतील असें मी समजतों. जर तुह्मांपैकीं कोणाला माराची भीति वाटत असेल तर त्यानें या क्षणींच निघून चालतें व्हावें."

लव्हिटचा नूर पालटला. तो आपले ओंठ चावूं लागला; व तेथून पाय काढावा असें त्याच्या मनांतही आलें; परंतु पहिल्यानें तेथून पाऊल काढण्याची त्याची छाती होईना; इतर मंडळी काय करिते, हें पहाण्याकरितां तो तसाच राहिला. कोणीही हालेना ह्मणून लव्हिटही तसाच उभा राहिला.

"बरें तर मग. 'मी तुझा विश्वासघात करणार नाहीं, मी तुला साह्य करीन व तूं मला करावेंस' असें शपथपुरःसर वचन दे पाहूं" असें टार्लेटन, आधीं आपल्या जवळच्या,

नंतर दुसऱ्या मुलांचा हात धरून ह्मणाला. प्रत्येक मुलानें हातावर हात मारून व 'मी तुला साह्य करीन व तूं मला करावेंस' अशीं अक्षरें पुनः उच्चारून वचन दिलें.

लव्हिट शेवटपर्यंत मागें राहिला होता. तो ज्या मुलाच्या आड होता त्या मुलाच्या अंगरख्याचें बिरडें तो चुरगळीत उभा होता. इतक्यांत टार्लटन त्याच्याजवळ आला आणि आपला हात पुढें करून ह्मणाला, "चल लव्हिट, तूं यांत आहेसच. तूं मला साह्य कर व मी तुला करीन." लव्हिट त्याच्या तोंडाकडे न पाहतांच त्याची कान उघाडणी करूं लागला, "खरोखरच टार्लटना, माझी अशी इच्छा आहे कीं, तूं हा बेत सोडून द्यावास. मी खात्रीनें सांगतों कीं तीं सर्व फळें या वेळीं गेलीं सुद्धां असतील. तूं हा बेत सोडून देशील तर फार चांगलें होईल. रागावूं नकोस. दे तर मग. हा बेत सोडून देच." टार्लटन ह्मणाला, "बेत रे कसला खुळ्या? अझून तूं कांहीं एक ऐकिलेंसच नाहींस वाटतें. आमचा बेत काय, तो सगळा समजून घेऊन मग तुझा उपदेश चालूं दे."

लव्हिटच्या मनांत हंसावें असें जरी नव्हतें, तरी त्याच्यानें गालांतल्या गालांत हांसल्यावांचून राहवेना.

टार्लटन ह्मणाला, "मी अगदीं उघडपणें सांगतों कीं आपल्याला तर बोआ तुला आज ओळखतांच येत नाहीं. अरे, पूर्वीं तूं इतका सुशील व मनमिळाऊ मुलगा असस कीं, असा दुसरा मुलगाच मिळणें कठीण. कोणी कांहीं जरी सांगितलें तरी तें करीत असस. परंतु तूं हार्डीबरोबर निघून चाललास, तेव्हांच आम्ही म्हणत होतों कीं, अलीकडे

तुझा स्वभाव अगदीं बदलला आहे. चल खुळ्या. जरा हिंमत धर व आमच्या मंडळींत मिसळ. नाहीं तर आम्ही सर्व जण तुझा द्वेष करूं." लव्हिट भयभीत होऊन ह्मणाला, "माझा द्वेष करणार!! नाहीं. तुह्मी कधींही माझा द्वेष करणार नाहीं." असें ह्मणतांच त्याचा हात आपोआप पुढें झाला. टार्लेटननें तो जोरानें हालवून ह्मटलें, "हां आतां ठीक झालें." लव्हिटच्या मनदेवतेनेंच त्याच्या कानांत सांगितलें कीं, "आतां मात्र खचित वाईट झालें!" परंतु त्याची मनदेवता त्याला कांहीं उपयोगी पडली नाहीं. कारण बहुमतापुढें ती नेहमीं कुंठित होई. 'सरळपणानें वागावयाची जरी त्याला वासना असे, तरी "मन मोठें व कर्म खोटें" या म्हणीप्रमाणें तसें वागण्या इतकें त्याच्या आंगीं धैर्य नव्हतें. त्याचे सोबती म्हणाले, "बिचारा लव्हिट!! आह्मांला ठाऊकच कीं तो कधींच नाहीं म्हणावयाचा नाहीं." टार्लेटननें तर जेव्हां त्याच्या हातांत हात घालून तो हालविला तेव्हांच त्याचा धिक्कार केला. खरेंच आहे, सदाचारी व दुराचारी हे दोघेही दुबळ्या मनाचा धिक्कार करितात.

याप्रमाणें कट झाल्यावर टार्लेटननें पुढारीपणाचा पूर्ण आविर्भाव धारण करून, आपली सर्व युक्ति उघड करून सांगितली. आणि त्या बिचाऱ्या वृद्ध मनुष्याच्या वृक्षावर धाड घालण्याचा बेत कायम केला. त्याचा हा एवढाच काय तो वृक्ष होता, तसा दुसरा कोठेंही नव्हता. त्यांची मसलत काय ठरली, ती आह्मी सांगत बसत नाहीं. कारण असल्या स्वाऱ्यांपासून जी करमणूक होते ती एक, आळशी मुलांचें, तशा कामांत पडण्याविषयीं, मन वळविणारी मुख्य गोष्ट होय.

११

पाठीमागच्या जिन्याच्या शेवटीं एक लहानशी खिडकी होती. तीमधून, रात्रीं नऊ व दहाच्या दरम्यान, टार्लेटन, लव्हिट व दुसरा एक मुलगा, यांस बरोबर घेऊन हळूच बाहेर पडला. ती चांदणी रात्र होती. तें काम मोठ्या हिमतीनें तडीस न्यावयाचें, असा लव्हिटचा निश्चय झाला. तें शेत ओलांडल्यानंतर त्यानें दाखविलेल्या फाटकावरून चढून ते सपाटून परंतु भीत भीत पावलें टाकीत त्या गल्लीखालीं गेले.

कांहीं अंतरावर ती सफेती दिलेली झोंपडी व तिच्याजवळच तो वृक्षही लव्हिटच्या दृष्टीस पडला. ते भराभर चालले. बागे सभोंवती लावलेल्या कुंपणांतून जातांना कांटे लागून जरी ओरखडे निघाले, तरी मोठ्या आयासानें ते कसेबसे पार पडले. जिकडे तिकडे सामसूम झालें होतें. तरी मधून मधून झाडांच्या पानांचा सळसळ आवाज झाला, ह्मणजे त्यासरसे ते दचकत व त्यांचा ऊर मोठ्यानें धडधडूं लागे. एकदां तर लव्हिट झाडावर चढत असतां, झोंपडीचें दार उघडल्याचा त्याला भास झाला. व त्यानें मोठ्या मिनतवारीनें आपल्या सोबत्यांची प्रार्थना केली कीं, हें काम बंद करून आतां घरीं चला. तथापि, त्यांचे खिसे त्या फळांनीं भरत तोंपर्यंत त्यांचें मन वळविण्याचा त्याचा उपाय चालेना. ते परतले हें पाहून त्यास फार आनंद झाला. ते त्या जिन्याच्या खिडकीनेंच हळूच आंत गेले. व प्रत्येक जण, अगदीं होईल तितकें मुकाट्यानें आपापल्या खोलींत निजावयास गेला.

लव्हिट हार्डीजवळ आपल्या खोलींत निजला. तो हार्डीस गाढ झोंप लागली आहे असें पाहून गेला होता,

म्हणून आतां त्याला जागें करण्याची त्यास भीति वाटली. न जाणो कदाचित् हार्डीला त्या फळांचा वास जाऊन आपलें सर्व वेंड बाहेर पडेल, ह्मणून ल्व्हिटनें आपल्या खिशांतलीं सर्व फळें सकाळपर्यंत टार्लेटनपाशीं दिलीं. खोलीचें दार किरकिरें होतें. परंतु तें ल्व्हिटनें इतक्या खबरदारीनें उघडिलें कीं, त्याचा आवाजसुद्धां ऐकूं आला नाहीं. आणि ल्व्हिट पाहतो तों आपल्या मित्रास पूर्वींप्रमाणेंच गाढ झोंप लागली आहे असें त्यास आढळून आलें.

तो आपल्याशींच ह्मणाला, "अहाहा! याला किती तरी गाढ झोंप लागली आहे!! मला जर अशीच झोंप आली असती तर किती बरें चांगलें झालें असतें!" ल्व्हिटचें अंत:करण ल्व्हिटला खाऊं लागलें. सुशीलपणानें वागण्याइतकें त्याला मानसिक सामर्थ्य नव्हतें. दुसऱ्याच दिवशीं रात्रीं, आपला भित्रेपणा, रात्रीं झालेला पश्चात्ताप, व केलेले सर्व निश्चय या सर्वांस गुंडाळून ठेवून, थोडीशी पुन: फजिती व विनवणी केल्यानंतर तीच गोष्ट करण्याकरितां त्याच मंडळीबरोबर जाण्याविषयीं त्याचें मन वळलें. तिसऱ्या दिवशीं अशीच लूट चालविण्याची त्यांना अधिक आवश्यकता पडली. कारण, जरी प्रथम ही गुप्त गोष्ट अगदीं थोड्या मंडळीला माहीत होती, तरी हळूहळू ती सर्व शाळेभर झाली. व लूट वांटून देऊन ती गोष्ट कोठेंही फुटूं न देण्याचें भाग पडलें.

ज्याला त्याला असें आश्चर्य वाटे कीं, हार्डी इतका चलाख व चाणाक्ष असूनही त्याला अद्यापपर्यंत आपलें कृत्य समजलें नाहीं. परंतु ल्व्हिटला मात्र जसा तो त्या

गोष्टीविषयीं वरून अज्ञान दाखवितो तसा खरोखरीच नसावा अशी शंका आल्यावांचून राहिली नाहीं. लव्हिटनें या गोष्टीवद्दल कोठेंही ब्र काढिला नाहीं. त्याला छक्केपंजे मुळींच माहीत नव्हते; ह्मणून आपल्या मित्राशीं संभाषण करितांना, अमुक एक गोष्ट भाषणांत आणावयाची नाहीं, हें त्याच्या मनांत नेहमीं वागत असल्यामुळें, तो अशा तऱ्हेनें बोलत असे कीं, त्याच्या योगानें लोकांना हटकून संशय येई. नंतर आपला हात गुंतला आहे, याचें त्याला स्मरण झाल्या-बरोबर तो खिजे; त्याची बोबडी वळे; व तो गोंधळून जाई. हार्डीनें तूं हें काय ह्मणतोस, असें विचारल्यास तो आपल्या वेडगळ व अपराधदर्शक मुद्रेनें "मला कांहीं माहीत नाहीं," असें उत्तर देई; किंवा मध्येंच एकदम ह्मणत असे कीं, "छे: कांहीं नाहीं बुआ! कांहीं एक नाहीं!!"

आपला मित्र जो हार्डी, त्याचा सल्ला घेण्याविषयीं मला परवानगी दे, ह्मणून लव्हिट टार्लटनच्या गळीं पडे; परंतु व्यर्थ. जेव्हां जेव्हां तो हा विषय काढी, तेव्हां तेव्हां टार्लटन काळा ठिक्कर पडे. आणि तो त्याच्या ह्मणण्यास अगदीं वाटाण्याची अक्षत लावी. व त्यावरो-वरच त्याला लागण्यासारखें आणखी असेंही ह्मणत असे कीं, "असल्या भित्र्या पोराशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेविला नसता, तर वरें झालें असतें. मला असें वाटतें कीं, आमचें कार्य होण्यापूर्वींच हा आह्मां सर्वांना तोंडघशीं पाडील." लव्हिट आपल्याशीं ह्मणाला, "वरें आहे. एकंदरींत आमची अशी पूजा होऊन सर्व श्रमांच्या मोबदला 'भित्रा' हें नांव मात्र मला अधिक मिळालें. खरोखर

असें ह्मणून घेणें तर फारच दुःसह. एवढ्या मोठ्या खटपटींत पडून शेवटीं माझ्या हातीं कांहीं लागलें नाहीं नाहीं तें नाहींच." खरोखर, त्याला कांहीं फारसें मिळालें नाहीं; कारण, त्या लुटीची वांटणी करितांना फक्त एक सबंध, व दुसऱ्यापैकीं एक अर्धें—तेंही अर्धें मुर्धें पिकलेलें असें फळ त्याच्या वांट्यास आलें. आणि खरोखर त्यांत समाधानाची गोष्ट एवढीच होती कीं, त्यांनीं आपापलीं सर्व फळें खाल्यानंतर, आपल्यांपैकीं गरीब लव्हिटला कांहीं फळें देण्यास आपण विसरलों, याबद्दल आपल्याला फार वाईट वाटतें, असें प्रत्येकानें प्रदर्शित केलें, एवढें त्यानें ऐकिलें.

नंतर त्या मुलांच्या खेपा त्या झाडाकडे इतक्या कांहीं वरचेवर होऊं लागल्या कीं, तें त्या झोंपडींत राहणाऱ्या वृद्ध मनुष्याच्या नजरेस आल्यावांचून राहिलें नाहीं. तो वरचेवर त्या आपल्या झाडाची पहाणी करीत असे. जीं फळें पाड लागतांना त्यानें लक्षपूर्वक पाहिलीं होतीं, तीं गुलाबी फळें कोठें दिसतनाशीं झाल्यामुळें, जरी तो संशयखोर नव्हता, तरी येथें कांहीं तरी लबाडी होत असली पाहिजे, असें त्याच्या मनांत येऊं लागलें. व मुख्यत्वेंकरून त्या कुंपणामधून केलेली खिंड व फुलझाडांच्या ताटव्यामध्यें कित्येक उमटलेलीं लहान लहान पावलें पाहून तर त्याला अधिकच संशय आला.

एखाद्या सजीव प्राण्याला दुःख देण्याला त्या भल्या वृद्ध मनुष्याचें मन कधींही प्रवृत्त होत नसे. तशांतून लहान मुलांस दुःख देण्याचें तर त्याचे मनांत मुळींच येत नसे; कारण लहान मुलेंच त्याला विशेषेंकरून आवडत असत.

तो बिलकूल लोभी नव्हता. कारण, जरी तो श्रीमंत नव्हता, तरी खाऊनपिऊन सुखी होता. याचें कारण असें कीं, तो आपल्या तारुण्याच्या अमदानींत फारच उद्योगी होता. ह्मणून आपल्याजवळ जें कांहीं थोडें बहुत होतें, तें लोकांस द्यावयास नेहमीं तयार असे. तसाच तो तिरसट थेरडाही नव्हता. जर त्याला एखाद्या गोष्टीचा राग यावयाचा तर तो तीं फळें बुचाडलेलीं पाहूनच आला असता. कारण त्या आपल्या आवडत्या वृक्षाचीं लाल फळें आपल्या वाढदिवशीं आपल्या नातवंडांना देऊन समाधानं मानावें, असा त्याचा बेत होता; तथापि, त्यानें त्या झाडाकडे रागानें न पाहतां दुःखानेंच पाहिलें. आणि आपल्या काठीवर टेंकून, आतां याउपर आपण काय केलें असतां चांगलें होईल, याविषयीं तो ह्मातारा विचार करूं लागला.

तो आपल्याशींच ह्मणाला, "मी जर त्यांच्या गुरुजीकडे ही कागाळी नेली, तर त्यांना खरोखर चोप बसेल. आणि तेणेंकरून मला फार दुःख होईल. तथापि त्यांना अशीच चोरी करूं देतांही कामा नये. तें तर त्याहूनही फारच वाईट. शेवटीं खरोखरच त्यांना फांसावर चढण्याचा प्रसंग यावयाचा. हां हां. आतां पाहूं दे मला. हेंच बरें आहे. मी आतां केंट शेतकऱ्याचा बार्कर कुत्रा मागून आणितों. तोच त्यांची राखण करील; अशी माझी खात्री आहे."

केंट शेतकऱ्यानें आपला बार्कर कुत्रा त्याला कांहीं दिवस दिला. आणि त्या वेळींच त्या आपल्या शेजाऱ्यांस अशी ताकीद केली कीं, यास नीट बांधून ठेव. कारण इंग्लंडांतील सर्व कुत्र्यांपेक्षां हा अतिशय क्रूर आहे. त्या वृद्ध

मनुष्यानें कैंटच्याच मदतीनें त्यास त्या झाडाच्या बुंध्याशीं सांखळीनें घट्ट बांधून टाकिलें.

रात्र झाली. टार्लटन, लव्हिट व दुसरे सवंगडी नेहमींच्या वेळीं आले. वारंवार शिकार साधल्यामुळें अधिक धीट होऊन ते हांसत व खिदळत आले. परंतु त्यांनीं बागेंत पाऊल टाकितां क्षणींच तो कुत्रा ताडदिशीं उठला. तो जसजसा पुढें उडी मारून येई तसतशी त्याची सांखळी खळखळ वाजे. तो त्वेषानें एक सारखा भुंकूं लागला. ते अद्यापिही जमिनीवर खिळून टाकल्याप्रमाणेंच उभे होते. कुत्रा दृष्टीस पडण्या इतकें चांदणें पडलें होतें. टार्लटन ह्मणाला, "चला, आपण झाडाच्या दुसऱ्या बाजूस जाण्याची खटपट करूं." परंतु ते ज्या ज्या बाजूला जात, तिकडे तिकडे तो कुत्रा एका क्षणांत उडी मारून येत असे व अधिकाधिक आवेशानें भुंके.

टार्लटन ह्मणाला, "तो आपली सांखळी तोडून घेऊन आह्मांस फाडून आमचे तुकडे तुकडे करून टाकील." असें ह्मणून भीतीनें त्यानें लगेच आपल्याबरोबर आणलेली टोपली फेंकून दिली, आणि तो अतिशय घाबरून त्वेरेनें पळत सुटला. कुत्रा सांखळीला हांसडा बसेपर्यंत उडी मारून जेव्हां गुरगुरूं लागला, तेव्हां लव्हिट केविलवाण्या स्वरानें म्हणाला, "अरे मला हात द्यारे, कोणी हात द्या. असें रे काय करितां? मला या कुंपणावरून येववत नाहीं. तुम्हांला देवीची शपथ आहे. ए मित्रा टार्लटना, मजकरितां एक क्षणभर तरी थांब फिरे!!" तो इतकें ओरडला; परंतु व्यर्थ. त्याला जातीनिशीं आपल्यावर आलेल्या संकटामधून पार पडण्याकरितां धडपडावें लागलें.

त्याच्या सर्व प्रिय मित्रांपैकीं दुसरा कोणीही त्याला मदत करण्याकरितां मागें परतला नाहीं. सरतेशेवटीं कांटे ओरखडून भयभीत होत्साता तो कुंपणांतून बाहेर पडून आपल्या मित्रांची त्यांच्या आपलपोटेपणाबद्दल निर्भर्त्सना करीत करीतच तो घरीं धांवत गेला. 'मी शूर, मी शूर' ह्मणून जो फुशारकी मारीत होता, त्याच टार्लेटनानें संकट गुदरल्याबरोबर, सर्व शूरत्व गुंडाळून प्रथमच पळ काढिला, हें त्याच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिलें नाहीं.

दुसरे दिवशीं सकाळीं त्यांच्या वर्त्तनाबद्दल त्या मंडळीला टोंचून बोलल्यावांचून लव्हिटला राहवेना. तो म्हणाला, "मला मदत करावयाला तुम्हांला, अरे तुमच्यांपैकीं एकालाही राहवलें नाहीं काय?" एकानें उत्तर केलें, "अरे, तुझी हांकच आह्मांला ऐकूं आली नाहीं." दुसरा म्हणाला, "मी तर बुआ इतका गांगरून गेलों होतों कीं, सर्व जग जरी मला बक्षिस दिलें असतें तरी मागें परततोंना." "आणि आपण टार्लेटन साहेब?" असें लव्हिटनें विचारलें. टार्लेटननें उत्तर दिलें, "मी? मूर्खा, माझी स्वतःचीच काळजी घेणें हें काम काय मला कमी होतें? या जगांत ज्यानें त्यानें आपली ** संभाळावी." लव्हिट गंभीरतेनें म्हणाला, "ठीक आहे. समजलें आतां!" टार्लेटन ह्मणाला, "पण, अरे बाबा, याच्यांत नवल तें कोणतें?" लव्हिट म्हणाला "हो हो. नवल म्हणजे? मला असें वाटत होतें कीं, तुम्ही सर्व माझ्यावर ममता करितां." टार्लेटन म्हणाला, "ईश्वरानेंच तुझ्यावर ममता करावी! आणि आम्हीही पण तशीच करितों. पण आमचा जीव आम्हांला अधिक प्यारा आहे." लव्हिटला त्याच्या बोलण्याचा किळस येऊन

तो तोंड फिरवून म्हणाला, "तथापि, हार्डी कांहीं माझ्याशीं असा वागला नसता." टार्लेटन दचकून म्हणाला, "अं: किती मूर्खपणाचा विचार तुझ्या डोक्यांत शिरला आहे हा!! आतां पुन: त्याबद्दल विचारच करूं नकोस कसा. आम्हां सर्वांना त्याबद्दल फार वाईट वाटतें. आम्ही तुझ्यापुढें पदर पसरतों. चल ये आपण शेकह्यांड* करूं. माफ कर आणि सगळें गिळून टाक. पुन: नको त्याचें नांव काढूं.

ल्हिटनें आपला हात पुढें केला; पण तो मनापासून केला नाहीं. तो म्हणाला, "मी तुम्हांला मनापासून माफ करितों. पण इतक्या लवकर मात्र याचा विसर पडावयाचा नाहीं!" "कां रे, तर मग आम्हीं जितका तुला सुशील समजत होतों तितका कांहीं तूं नाहींस. खरोखरच, ल्हिट, आतां कांहीं तूं आमचा मनांत द्वेष करणार नाहींस तर!!" ल्हिट थोडा हांसला व त्यानें कबूल केलें कीं, खरोखर माझ्यानें द्वेष करवणार नाहीं. "बरें तर चल. तुला हें पक्कें माहीत आहेच कीं, आमची तुझ्यावर अंत:करणापासून ममता आहे; व आम्ही तुझ्याकरितां काय हवें तें करूं." बिचाऱ्या ल्हिटचा, या हरभऱ्याचा झाडावर चढविण्यानें त्यांच्यावर असा विश्वास बसत चालला कीं, ते बोलल्याप्रमाणें खरोखरच आपल्यावर मनापासून ममता करितात. आणि त्याला धडधडीत डोळे असूनही तो अंधाप्रमाणें खड्ड्यांत पडावयास पुन: तयार झाला.

---

* आमच्यांत जसा नमस्कार किंवा रामराम करितात, तसा त्यांच्यांत शेकह्यांड करितात: परस्परांस भेटलें ह्मणजे एकमेकाचें हात एकमेकांनीं धरून हालवावयाचे.

तो विचार करूं लागला, "काय हो चमत्कार हा, कीं ज्यांचा मी तिरस्कार करीत होतों त्यांच्याच प्रीतीचें इतकें मोठें महत्व मला वाटावें? एकदां या लचांडांतून बाहेर पडलों कीं अतःपर त्यांचें दर्शनसुद्धां घ्यावयाचें नाहीं, असा मीं निश्चय केला आहे." त्याचा प्रिय मित्र जो हार्डी त्याच्याशीं ताडून पहातां त्याचे सर्व मित्र त्याला कस्पटासमान वाटले. कारण हा कालपर्यंत हार्डीच्या त्याच्यावरील प्रेमामध्यें कधींही तफावत दिसली नाहीं. त्यानें त्याचीं गुह्यें समजून घेण्यास प्रयत्न केला नाहीं. तथापि, जेव्हां जेव्हां तो कांहीं विश्वासाच्या गोष्टी सांगे, तेव्हां तेव्हां त्या ऐकण्यास तो नेहमीं तयार आहेसा दिसे.

शाळा सुटल्यानंतर संध्याकाळीं हार्डी आपल्याकरितां एक कागद आंखीत होता. त्या वेळेस लव्हिट त्याच्याजवळ निमुटपणें उभा असतां टार्लेटन आपल्या उद्धटपणानेंच वर आला व लव्हिटचा हात धरून म्हणाला, "लव्हिट, चल मजबरोबर; मला तुला कांहीं सांगावयाचें आहे.

लव्हिट (त्याचा हात सोडवून घेऊन.)— मला आतां नाहीं यायला होत.

टार्लेटन— (आर्जवयुक्त स्वर काढून) चल रे, आतांच चल.

ल.— येईन अमळशानें.

टा.— छे, छे, आतांच चल रे बाबा. तो पहा एक भला मनुष्य वाट पहात उभा आहे. चल. मला तुला कांहीं सांगावयाचें आहे.

ल.— मला काय सांगणार आहेस तूं? मला तूं त्रास देऊं नको. इतकें तो बोलला, तथापि टार्लेटन त्याला एकीकडे घेऊन गेला व लव्हिटही त्याच्याबरोबर गेला.

टार्लटननें त्याला खुलवून पुनः ताळ्यावर आणण्यासाठीं मेहनत घेतली. आपली खेळावयाची वस्तु दुसऱ्यास देण्यासारखा जरी तो नव्हता, तथापि, तो इतकें देखील म्हणावयास मागें सरला नाहीं कीं, "लव्हिट त्या दिवशीं तुला एक भोंवरा पाहिजे होता; जर तुला हवा असेल तर मी आपला देईन." लव्हिटनें त्याचे आभार मानिले. आणि आतां आपल्याला एक भोंवरा मिळेल म्हणून त्याला अतोनात हर्ष झाला. तो म्हणाला, "परंतु तूं मला काय सांगणार होतास?"

टार्ल.— हो. पण इतक्यांतच नको. आमचें भाषण कोणासही ऐकूं येणार नाहीं, अशा जागीं जाऊन अमळशानें बोलूं.

लव्हि.— जवळ आतां कोणीही नाहीं.

टार्ल.— (संशयानें आसपास पाहून) तरी पण जरासा पुढेंच चल.

लव्हि.— बरें तर.

टार्ल.— आपल्याला त्या रात्रीं भिवविणारा कुत्रा तुला माहीत आहेच.

लव्हि.— होय.

टार्ल.— तो आपल्याला पुनः कधींही भिवविणार नाहीं.

ल.— काय? भिवविणार नाहीं? तो रे कसा?

निळ्या हातरुमालांत गुंडाळलेलें कांहींसें आपल्या खिशांतून काढून टार्लटन लव्हिटला म्हणाला, "हें बघ."

ल.— काय रे तें? (टार्लटननें तें उघडिलें.")

ल.— (मोठ्यानें) हिरवें मांस!! हिरवें मांस!! तुला रे तें कसें मिळालें?

टार्ले.— तो नोकर मुलगा टॉम आहे, कीं नाहीं, त्यानें तें मजकरितां आणिलें आहे. त्याला मी याबद्दल चार आणे देणार आहें.

ल.— आणि तें त्या कुत्र्याकरितां काय?

टा.— होय. मी त्याचा सूड उगवीन ह्मणून विडा उचलिला आहे. हें खाल्ल्यानंतर तो पुनः कधींही भुंकणार नाहीं.

ल.— (भीतीनें दचकून) पुनः कधींही भुंकणार नाहीं? काय ह्मणतोस? तर मग तें काय विष आहे?

टार्ले.— (गोंधळून) होय. पण तें फक्त कुत्र्याकरितां आहे; पण काय रे, मनुष्याकरितां असतें तर जितकी कांहीं तुझी मुद्रा भयभीत दिसली असती तिच्या पेक्षांही आतां अधिक दिसते.

ल्व्हिटं सुमारें एक मिनिटभर गप्प राहिला. शेवटीं आपला स्वर व बोलण्याची तऱ्हा बदलून तो ह्मणाला, "टार्लटन, तूं असा आहेस, हें मला माहीत नव्हतें. अतः-पर तुझा संबंध देखील नको बुआ!!" टार्लटन त्याचा हात धरून ह्मणाला, "छे, पण जरा थांब तर खरा! मी फक्त थट्टा केली रे ती!!"

ल.— सोड माझा हात. तूं तें मनापासून करणार होतास.

टा.— परंतु मी जें करणार होतों तें मी त्यापासून कांहीं इजा होईल, हें मला समजण्याचे पूर्वी करणार होतों. त्यापासून अपघात होईल असें तुला वांटतें काय?

ल.— कां होणार नाहीं वरें?

टा.— तुला माहीतच आहे कीं मला हें माहीत अस-सण्याचा संभव नाहीं. कारण टॉम सांगतो कीं, कुत्र्यास

मारण्यासाठीं हा प्रयोग वारंवार करितात. विचार हवें तर टॉमला.

ल्व्हि.— मी कोणालाही विचारणार नाहीं. खरोखर, चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें टॉमपेक्षां आह्मांला अधिक कळतें.

टा.— परंतु नुसतें त्याला विचार तरी; आणि तो काय म्हणतो, तें तर ऐक.

ल.— (आवेशानें) तो काय सांगणार तें ऐकण्याची मला मुळींच जरूर नाहीं. तो बिचारा कुत्रा हालहाल होऊन मरेल! माझ्या बापाच्या घरीं एका कुत्र्याला विष घातलें होतें. मी त्याला वाडग्यांत पाहिलें. गरीब बिचारा प्राणी !! तो जमिनीवर लोळला, गुरगुरला व त्यानें आंगास आळोखेपिळोखे दिले.

टार्ले.— (दांभिकपणाचा स्वर काढून) गरीब रे गरीब बिचारा प्राणी!! आतां कांहीं तसें कोणी करीत नाहींत.

परंतु, ल्व्हिटला असें ढोंग दाखविण्याचें जरी त्याला आवश्यक वाटलें, तरी पण आपलें कृत्य शेवटास नेण्याचा त्यानें पूर्णपणें निश्चय केला.

• बापड्या ल्व्हिटला निघून जाण्याची घाई झाल्यानें तो आपला मित्र जो हार्डी त्याकडे परत आला; परंतु त्याचें मन इतकें क्षुब्ध झालें होतें कीं त्यानें हूं कीं चूं केलें नाहीं. दोन तीन वेळ तर त्याला इतका कांहीं हुंदका आला कीं त्याच्या डोळ्यांतून अश्रु अगदीं निघावयाच्या बेतांत होते.

हार्डी त्याची समजूत करीत असतांना तो हार्डीला ह्मणाला, "माझ्याशीं तूं किती सुशीलतेनें वागतोस ह्मणून सांगूं? परंतु जर तुला माहीत—" इतकें बोलून तो मध्येंच थांबला; कारण, सायंकाळच्या प्रार्थनेची घांट वाजली. ते सर्व आपापल्या जागीं जाऊन बसले व सर्वांनीं गुडघे टेंकिले. प्रार्थना आटोपल्यानंतर निजावयास जातांना ल्व्हिटनें टार्लटनला थांबविलें व त्याच्याकडे निरखून पाहून त्यास "कसें काय!" म्हणून विचारिलें. त्याच्या चौकस मुद्रेला न जुमानतां टार्लटननें त्याच्याकडे मोठ्या तोऱ्यानें पाहून उत्तर दिलें, "छान आहे." "आज रात्रीं आपण काय करणार?" "तूं निजणार तसाच पण मीही निजणार आहें." असें टार्लटननें उत्तर देऊन तो एकदम परतला व तोंडानें शीळ घालीत चालता झाला.

ल्व्हिट आपल्याशींच म्हणाला, "वाहवा!! त्याचें मन खरोखरीच बदललें. एरवीं तो शीळ घालीत गेला नसता."

यानंतर सुमारें दहा मिनिटांनीं तो व हार्डी आपले आंगांतील कपडे काढीत असतांना हार्डीला अकस्मात् आठवण झाली कीं आपण आपला नवीन पतंग कुरणामध्यें विसरून आलों. तो ह्मणाला, "अरेरे! तो आतां उजाडण्याच्या पूर्वींच अगदीं नासून जाईल." ल्व्हिट ह्मणाला, "टॉमला बोलाव आणि तो त्याला एका मिनिटांत आणायला सांग." ते दोघेही टॉमला हांक मारीत जिन्याच्या अगदीं शेवटापर्यंत गेले; परंतु कोणीही उत्तर दिलें नाहीं. त्यांनीं पुनः मोठ्यानें "टॉम खालीं आहे काय?" ह्मणून

विचारिलें: सरतेशेवटीं टॉम थोडासा गोंधळून टार्लटनच्या खोलीबाहेर आला व धीटपणानें ह्मणाला, "हा मी येथेंच आहे." टॉम हार्डीचा निरोप ऐकून घेत असतां त्याच्या खिशांतून त्या निळ्या रुमालाचा एक पदर खालीं लोंबत आहे असें लव्हिटनें पाहिलें. त्या योगानें लव्हिटच्या मनांत नवीन संशय उत्पन्न झाला. परंतु एक शब्दही न बोलतां तो लागलाच आपल्या खोलींतील खिडकिशीं जाऊन उभा राहिला. त्या खिडकीचें तोंड त्या गल्लीकडे होतें. चंद्रोदय झाला होता ह्मणून तिकडून कोणी गेला कीं काय, हें त्याला चांगलें दिसत होतें. कांहीं वेळ त्याच्याकडे पाहिल्यानंतर हार्डी त्याला ह्मणाला, "तिथें रे तूं काय करीत आहेस? निजायाला कां नाहीं येत?" यावर लव्हिटनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. परंतु तो खिडकिशीं होता तसाच राहिला. त्याला विनाकारण फार वेळ तिष्ठत उभें राहावें लागलें नाहीं. थोडक्याच वेळांत त्यानें टॉमला त्या दरवाजांतून पाऊल वाटेनें हळू त्या गल्लीकडे जातांना पाहिलें.

लव्हिट मोठ्यानें ह्मणाला, "गेलाच तो तें करायला!!" या वेळीं त्याला इतका कांहीं गहिंवर आला होता कीं, तो त्याला आंवरतां आला नाहीं. हार्डी दचकून उठून ह्मणाला, "कोण गेला? व काय करण्यास गेला?" लव्हिट पुढें बोलूं लागला, "किती निर्दयपणा! काय दुष्टपणा तरी हा!!" "कसला निर्दयपणा व कसला दुष्टपणा? बोल काय तें एकदम." असें हार्डीनें हुकमतीच्या स्वरानें विचारलें. अशा प्रकारचा स्वर दुबळ्या मनाच्या मनुष्यांवर, धारण करण्याचा अधिकार आपल्याला आहे असें धैर्यवान्

मनुष्यांना मात्र वाटत असतें. ल्व्हिटनेंही तत्क्षणींच त्याला ती गोष्ट असंगतवार पण साग्र सांगितली. त्याचें बोलणें संपतें न संपतें तोंच हार्डी अंथरुणावरून ताड्दिशीं उठला व एक चकार शब्दही न बोलतां आपला पोषाख करूं लागला. ल्व्हिट अत्यंत चिंतातुर होऊन ह्मणाला, "देवाची शपथ, तूं आतां काय करणार तें सांग मला. ते मला कधींही क्षमा करणार नाहींत. मला तोंडघशीं पाडूं नको! नाहीं. ते क्षमा नाहींच करणार रे. मी तुझ्या पायां पडतों. बोल काय तें लवकर. मी तुला तोंडघशीं पाडणार नाहीं इतकेंच मला वचन दे." हार्डी ह्मणाला, "मी तुला तोंडघशीं पाडणार नाहीं, हें तुला पक्कें ठाऊक असूं दे." इतकें बोलून तो खोलींतून निघाला. ल्व्हिट चकित होऊन उभा राहिला. इतक्यांत तें विष त्या कुत्र्याला घालण्याच्या पूर्वींच टॉमला गांठावें अशा आशेनें होईल तितक्या त्वरेनें कुरण ओलांडून, हार्डी धांवत धांवत त्या गल्लीच्या खालीं गेला. टॉम बांधावरून चढून त्या ह्मातार्‍याच्या बागेंत जात आहे, तोंच त्यानें त्याला गांठिलें. हार्डीला फार दम लागला होता. त्याच्या योगानें त्याला बोलवेना. ह्मणून त्यानें त्याला खेचून धरून खालीं ओढिलें, व तोंडांतून शब्द उमटण्यापुरता दम खाईपर्यंत त्यानें त्याला गच्च आंवळून धरिलें.

"कोण तें? हार्डी साहेब तुह्मीच कां? काय आहे काय? आपल्याला काय पाहिजे?"

"तुझ्या खिशांत विष घातलेलें मांस आहे तें मला पाहिजे."

टॉम आपल्या त्या मुद्देमाल असलेल्या खिशावर हात ठेऊन ह्मणाला, "मजजवळ असला कांहीं पदार्थ आहे ह्मणून

आपल्याला कोणीं सांगितलें?" "मला तें मुकाट्यानें देशील तर मी तुला जाऊं देईन." त्या दोघांपैकीं टॉम जरी अधिक सशक्त होता, तरी तो कांपत कांपत ह्मणाला, "महाराज, शपथपुरस्सर मी आपल्याला खचित सांगतों, कीं मजजवळ तें नाहीं! मीं आणिलें नाहीं! तुह्मी काय ह्मणतां, हें मला ठाऊक नाहीं! खरोखर, कांहीं समजत नाहीं!!"

हार्डी मोठ्या रागानें ह्मणाला, "तुला सगळें माहीत आहे. दे तें आधीं." नंतर दोघांचीही मोठी मारामारीची झटापट सुरू झाली.

तो कुत्रा त्या बोलाचालीच्या गोंगाटानें भयभीत होऊन मोठ्या त्वेषानें भुंकूं लागला. न जाणो कदाचित् तो हातारा बाहेर काय गडबड चालली आहे हें पहाण्यास येईल, अशी टॉमला मोठी भीति पडली. त्याचें धैर्य सुटलें. तो रुमाल व तें मांस कुंपणावरून फेंकून देऊन तो होईल तितक्या त्वरेनें तडक पळत सुटला. रुमाल पडला तो कुत्र्याच्या उडीच्या टप्याच्या आंतच पडला. त्या कुत्र्यानें तो चट्दिशीं धरिला. सुदैवानें, तें मांस त्यांतून सुटून बाहेर आलें नाहीं. जेवळच एका उकिरड्यावर एक दाताळें पडलें आहे असें हार्डीनें पाहिलें. तें घेऊन त्यानें त्या रुमालांत खुपसलें. तो कुत्राही तो रुमाल ओढून, फाडून भुंकूं लागला, गुरगुरूं लागला व कुंईकुंई करूं लागला. त्याच्या दातांमधून तो रुमाल सोडवून घेणें अगदीं अशक्य होतें. परंतु ती रुमालाची गांठ ढिली पडून तें मांस, कुत्र्याच्या नजरेस न पडतां, खालीं पडलें. व ज्या वेळीं तो कुत्रा, तो रुमाल मोठ्या आनंदानें ओढून नेऊं लागला, तेव्हां हार्डीला अव-

र्णनीय आनंद होऊन त्यानें तें दांताळें त्या मांसांत रोंवून तें मांस बाजूस काढून घेतलें.

हार्डीला इतका आनंद झाला कीं, त्याहून अधिक आनंद समरांगणांतून विजयी होऊन परत आलेल्या वीरासही होत नसेल. आपल्या परोपकारास यश आल्यामुळें आनंदित होत्साता हार्डी मोठ्या हर्षानें घरीं चालला. त्या खिडकीच्या कठड्यावरून आंत उडी मारितांच सक्रुद्दर्शनीं व्यवस्थापक मि. पॉवर साहेब त्याच्या दृष्टीस पडले. ते हातांत मेणबत्ती घेऊन माडीवर जिन्याच्या अगदीं वर उभे होते.

विल्यम पॉवर रागीट स्वरानें ह्मणाला, "चल वर ये. तूं कोणीही ऐस. मला वाटलेंच होतें कीं सरतेशेवटीं मी तुला शोधून काढीनच. चल ये वर. कोणीही असलास तरी बेहत्तर!" हार्डी उत्तर न देतां वर गेला. पॉवर आश्चर्यानें पाठीमागें सरून ह्मणाला, "हार्डी!!" दिवा त्याच्या तोंडापुढें करून व नाक मुरडून तो पुनः ह्मणाला, "हार्डी, तूंच कां हा! हार्डी, खरोखर जर मि. ट्रुमन एथें असते तर त्यांना सुद्धां "चक्षुर्वैसत्यं" ही ह्मण अगदीं खोटी वाटली असती. माझ्याविषयीं ह्मणशील तर, मी तुला फार दिवसांपासून ओळखून आहें. मला असले साधु कधींही आवडत नाहींत. अहो राजेश्री, जर आपल्याला फार आयास होत नसतील तर आपले खिसे मोकळे करून दाखविण्याची आमच्यावर मेहेरबानी कराल काय?" हार्डीनें मुकाट्यानें तसें केलें. "वाहवा! हें काय? मांस! कच्चें मांस! आणखी काय आहे?" आपले खिसे उलटे करून हार्डी ह्मणाला. "झालें एवढेंच." मि. पॉवर तें मांस

घेऊन ह्मणाला, "एवढेंच काय तें." हार्डी मध्येंच मोठ्या उत्सुकतेनें ह्मणाला, "महाराज, कृपा करून तेवढें मांस जाळून टाका. त्यांत विष आहे." तें ऐकतांच विल्यम पॉवरच्या हातांतून तें मांस खालीं गळून पडलें. तो ह्मणाला, "काय यांत विष घातलें आहे? अरे नष्टा!!" त्याला दरडावून तो आणखी ह्मणाला, "काय या सर्वांचा अर्थ? बोल लवकर." हार्डी उगाच राहिला. विल्यम पॉवरनें उतावीळपणानें त्याच्या खांद्यास धरून त्यास हालवून ह्मटलें, "बोलत कां नाहींस?" तरीही हार्डीनें मौन सोडिलें नाहीं. हार्डीच्या खांद्यावर हात ठेवून त्यास खालीं दाबून पॉवर ह्मणाला, "*गुडघे टेंक व सारें कबूल कर. तूं कोठें होतास? काय करीत होतास? व तुझे साथीदार कोण कोण आहेत? हें मला सांग. कारण तुमची एक टोळी आहे हें मला माहीत आहे. याकरितां या क्षणींच गुडघे टेंकून सारें कबूल कर. तुला सुटण्याला एवढाच काय तो मार्ग खुला आहे. माझ्याच क्षमेची जर तुला अपेक्षा असेल तर मी खचित सांगतों कीं तूं ती मागितल्यावांचून तुला मिळणार नाहीं."

हार्डी धीट, पण आदरशील स्वरानें ह्मणाला, "मला क्षमाही मागावयाची नाहीं; व कांहीं कबूलही करावयाचें नाहीं. मी निरपराधी आहें. जर मी तसा नसेन तर मी माझ्या मित्रांना तोंडीं देऊन आपली सुटका करून घेण्याच्या भरीला कधींही पडणार नाहीं." "ठीक आहे, राजेश्री! फार चांगलें आहे! हाच हट्ट धरा. माझाही पण तुह्मांला

* प्रार्थना करितांना गुडघे टेंकण्याची चाल ख्रिस्ती लोकांत आहे.

असाच उपदेश आहे कीं तुह्मीं हें आपलें ह्मणणें अगदीं सोडूं नका. मग पाहूं आह्मीं; अहो सात्विकराव, आमचे काका डॉक्टर घरीं आल्यावर उद्यां आपण कसे दिसाल तेंही पाहूं." हार्डी न डगमगतां ह्मणाला, "जसा मी आतां दिसतों आहें तसाच दिसेन."

ही त्याची शांतवृत्ति पाहून पॉवरला असा कांहीं राग आला कीं त्या आवेशांत त्याच्या तोंडांतून शब्द उमटेना. हार्डी ह्मणाला, "महाराज, शाळेंत येऊं लागल्यापासून मी कधींही असत्य भाषण केलें नाहीं. याकरितां तुह्मी मजवर विश्वास ठेवाल अशी मला आशा आहे. मी आपल्याला शपथपूर्वक सांगतों कीं माझें बिलकुल वांकडें पाऊल पडलें नाहीं." "बिलकुल वांकडें पाऊल पडलें नाहीं? फार चांगलें!! मीं तुला रात्रीचा बाहेर हिंडतांना पकडलें तरी सुद्धां तुझें पाऊल वांकडें पडलें नाहीं अं:!!" हार्डी देह-भानावर येऊन ह्मणाला, "ही गोष्ट मात्र वाईट आहे खरी. परंतु त्यावांचून–" "त्यावांचून बिचून मला कांहीं जरूर नाहीं; अहो संभावित, चला मजबरोबर. क्षमा करण्याची वेळ निघून गेली."

इतकें बोलून त्यानें हार्डीला एका अरुंद वाटेनें एका लहानशा खोलीकडे ओढीत नेलें. ती खोली जिवावर उदार झालेल्या गुन्हेगारांकरितांच राखून ठेविली होती. "अंधार कोठडी" या नांवानेंच ती नेहमीं प्रसिद्ध असे. त्यानें त्याला आंत लोटून देऊन ह्मटलें "राजेश्री, ही पहा खोली. येथें आज रात्रीं आपण वस्ती करावी. उद्यां मला अधिक माहिती मिळेलच; आणि आपण असें कां केलें तेंही पण समजेल." असें बोलून त्याला आंत घातल्यानंतर त्यानें दारास दोन

कुलुपें ठोंकून टाकिलीं व तीं खडखडावून पाहिलीं. त्याच्या-पर्यंत आंत कोणाचाही प्रवेश होऊं नये ह्मणून त्या वाटेच्या दारालाही कुलूप घातलें. पॉवर आपल्याशींच ह्मणाला, "आतां मात्र तूं सुरक्षित राहशील असें मला वाटतें." असें ह्मणून तो इतक्या मोठ्या जोरानें पावलें टाकीत जिन्यावरून खालीं चालला कीं, त्याच्या योगानें सर्व ग्यालरी दणाणून गेली व पुष्कळ अपराध्यांची पांचावर धारण बसलीं.

जिन्याच्या वरच्या बाजूस हार्डीचें व पॉवरचें जें संभाषण झालें होतें तें मुलांनीं मोठ्या उत्कंठेनें ऐकिलें; परंतु त्यांपैकीं मधूनमधून एखादा दुसरा शब्द मात्र व्यक्तपणें दूरून ऐकूं येई.

त्या अंधार कोठडीला कुलूप घालतांना भयंकर आवाज झाला. हें कशाचें सूचक हें कांहीं जणांना समजलें नाहीं; इतरांना मात्र पक्केपणीं समजलें. प्रातःकाळीं सर्वजण चिंतातुर होऊन एके ठिकाणीं जमले. टार्लेटन व लव्हिट यांची मुद्रा अतिशय चिंताक्रांत दिसत होती. टार्लेटनची आपल्या स्वतःकरितां, व लव्हिटची मात्र आपल्या मित्राकरितां, स्वतः-करितां व बाकीच्या प्रत्येक जणाकरितां होती. जो तो—त्यामध्यें टार्लेटन पुढारी होता—त्याचे सभोंवतीं जमून लव्हिटवर शिव्यांची लाखोली वाहूं लागला. कारण आपल्यावर आलेल्या संकटांचा उत्पादक हाच आहे असें त्यांना वाटलें. "तुझ्यानें असें करवलें तरी कसें? वचन दिलें असतांही त्याविषयीं तूं हार्डीला कां सांगितलेंस? हायहाय, आतां आह्मीं काय करावें? तूं आमच्यावर केवढें संकट आणिलेंस हें? लव्हिट, हा सर्व तुझा अपराध आहे." बिचारा लव्हिट सुस्कारा सोडून

ह्मणाला, "माझाच अपराध! बरें बाबांनो; हें भाषण मात्र दु:सह आहे खरें."

"अरे बापरे! ती पहा घांट झाली," असें पुष्कळ जण एकदम ओरडले. "चला, तर मग आतां." ते सर्वजण अर्ध-वर्तुलाकार करून प्रार्थनेस उभे राहिले. नंतर त्यांनीं पुढील शब्द कान देऊन ऐकिले—".तो पहा इकडे येत आहे. छे:—होय—होय. तो तोच इकडे येत आहे." नंतर विल्यम पॉवर कपाळाला आठ्या घालून आला आणि त्या खोलीच्या वरच्या भागाला जेथें त्याची जागा होती तिकडे गेला. त्यांनीं प्रार्थना करण्याकरितां गुडघे टेंकिले. ते उठतां क्षणींच विल्यम पॉवर मेजावर हात ठेवून मोठ्यानें ह्मणाला, "सभ्य गृहस्थहो, जर तुमची मर्जी असेल तर एक क्षणभर मुकाट्यानें उभे रहा." सर्वजण अगदीं गपचिप उभे राहिले. मि. पॉवर मंडळींतून निघून गेला. तो हार्डीस आणावयास गेला असावा अशी सर्वांची कल्पना झाली. सर्व खोलीभर चळवळ झाली. जो तो एकमेकांना मोठ्या उत्कंठेनें विचारी; पण त्याचें उत्तर कोणालाही देतां येत नसे. असें विचारीत कीं,—"कायहो त्यानें सांगितलें काय? त्यानें काय काय सांगितलें बरें? त्यानें कोणाचें नांव सांगितलें?" जो तो ह्मणूं लागला, "त्यानें माझ्याविषयीं कांहीं सांगितलें नसावें असें मला वाटतें." टार्लटन ह्मणाला, "मी तुह्मांला खचित सांगतों कीं त्यानें आह्मां सर्वांचीं नांवें सांगितलीं आहेत." लव्हिट सुस्कारा सोडून ह्मणाला, "आणि मीही पण सांगतों कीं त्यानें आह्मांपैकीं एकाचेंही नांव सांगितलें नाहीं." टार्लटन ह्मणाला, "आपल्या सुटकेची वेळ आली असतांही सांगणार नाहीं, इतका तो मूर्ख आहे असें समजूं नको."

या वेळीं त्या कैदीला (हार्डीला) आंत आणिलें. जेव्हां तो त्या मंडळींतून चालला तेव्हां जो तो त्याच्याकडे पाहूं लागला. परंतु त्यानें कोणाकडेही पाहिलें नाहीं. लव्हिटनें तो जात असतां त्याचा आंगरखा धरून ओढला तरी त्यानें लव्हिटकडेसुद्धां पाहिलें नाहीं. प्रत्येक जणाला श्वासोच्छ्वास करण्याची भीति वाटूं लागली. मि. पॉवर मि. ट्रुमनच्या खुर्चीवर बसला. त्यानें त्या बंदीवानाला (हार्डीला) आपल्यासमोर उभें केलें व ह्मटलें, "अहो राजेश्री, आज तरी तुह्मी मला कांहीं सांगतां कां?" हार्डीनें विनयानें तें ठरींवच उत्तर दिलें, "कांहीं नाहीं. मी काल रात्रीं आपणास जें सांगितलें त्याहून अधिक कांहीं नाहीं."

पॉ.—अधिक कांहीं नाहीं?

हा.—कांहीं नाहीं.

पॉ.—तर मग याचा निकाल होण्यापूर्वीं मी तुला आणखी कांहीं सांगणार आहें. आणि तें पुष्कळच सांगावयाचें आहे.

इतकें बोलून त्यानें त्याला चवताळून धरिलें. तो त्याला खरमरीत चोप देणार इतक्यांत त्या शाळेंतील खोलीचें दार उघडून मि. ट्रुमन आले. त्यांच्या मागोमाग दुसरा एक ह्मातारा मनुष्य आला. त्याला लव्हिटनें लागलेंच ओळखलें. तो काठी टेंकीत टेंकीत चालला होता. त्याच्या दुसऱ्या हातांत फळांनीं भरलेली एक टोपली होती. मंडळींत येतांच मि. ट्रुमन एकदम थांबले. खरोखरी आश्चर्यभरित होऊन त्यांनीं "हार्डी!" असे उद्गार काढिले. हा वेळपर्यंत विल्यम पॉवरनें आपला उगारलेला हात तसाच आंवरून धरिला होता. तो ह्मणाला, "होय हार्डीच! तरी मी त्याला

सांगितलेंच होतें कीं आपण जेव्हां पहाल तेव्हां "चक्षुर्वै-सत्यं" ही ह्मण आपल्याला कधींही खरी वाटणार नाहीं."

मि. टुमन हळूच पुढें गेले. पॉवरनें उत्सुकतेनें त्यांना एकीकडे नेऊन त्यांच्या कानांत कांहीं गुणगुणून ह्मटलें, "आतां मला मारण्याची परवानगी द्या."

त्याला बरें ह्मणून सांगून मि. टुमन हार्डीस उद्देशून जें कांहीं ह्मणाले, त्याच्या योगानें, हार्डी जर खरोखरी अपराधी असता तर त्याच्या अंतःकरणास खचित घरें पडले असते. ते म्हणाले, "मी तुझ्या संबंधानें फसलों असें मला वाटतें. नुकतें तीन तासांपूर्वींच मीं तुझ्या चुलत्याजवळ सांगितलें कीं माझ्या शाळेंत हार्डी इतका विश्वासनीय मुलगा आजपर्यंत कधींही आला नाहीं. परंतु मान व प्रामाणिकपणा यांचा आंव घालून, माझें तोंड क्षणभर एकीकडे झालें नाहीं तोंच, माझ्या पश्चात् माझी आज्ञा मोडण्याचा कित्ता प्रथम तूंच घालून दिलास. पण माझी आज्ञा मोडण्याच्या संबंधानेंच मीं तुला कां बोलावें?—तूं चोर आहेस" हार्डीची मनोवृत्ति त्याला इत उत्तर आंवरेनाशी झाल्यामुळें तो म्हणाला, "मी आणि चोर?" मि. टुमन सर्व खोलीभर निरखून पाहून म्हणाले, "होय तूंच. तूं आणि दुसरे कांहीं जण." विल्यम पॉवर मध्येंच म्हणाला, "जर तुमच्या हातून होईल तर तेवढेंच त्याच्याकडून काढून घ्या—विचारा त्याला." "मी त्याला कांहीं विचारणार नाहीं. त्याची सत्यता व थोरपणा हीं मीं कधींही कसोटीस लावणार नाहीं. सत्य व थोरपणा हीं चोरांत कधींही आढळावयाचीं नाहींत." हार्डी रागानें म्हणाला, "मी चोरही नाहीं व चोरांशीं माझा संबंधही नाहीं."

मि. ट्रुमननें त्या टोपलींतून एक फळ हातांत घेतलें व विचारलें, "या मनुष्याला तूं कधीं बुचाडलें नाहींस काय? या फळांची चव तुला माहीत नाहीं काय? "नाहीं, गुरुजी, नाहीं. मी त्यांच्या एकाही फळास शिवलों नाहीं." "एकाला शिवलों नाहीं अं:!! हें भाषण दुटपीपणाचें दिसतें. हें कृत्य अत्यंत नीचपणाचें आहे. तूं अतिशय वाईट गोष्ट केलीस. तूं इतका क्रूर व नीच आहेस कीं त्याच्या कुत्र्याला सुद्धां विष घालण्याला तयार झालास. तें विष घातलेलें मांस तुझ्या खिशांत काल रात्रीं सांपडलें." "तें मांस माझ्या खिशांत सांपडलें खरें. परंतु त्या कुत्र्याला विष घालण्याचा माझा हेतु नव्हता. मी त्याचा प्राण वांचविला." तो म्हातारा मनुष्य म्हणाला, "ईश्वर त्याचें कल्याण करो." विल्यम पॉवर म्हणाला, "छे हो मोठा लुच्चा आहे तो. तुम्ही त्याला पुनः कधींही फसणार नाहीं असें मला वाटतें." "छे त्याला मला मुळींच फसवितां यावयाचें नाहीं. माझ्यापाशीं असा कांहीं जबरदस्त पुरावा आहे कीं त्याजबद्दल त्यास मुळींच माहिती नाहीं." असें बोलून त्यानें आपल्या खिशांतून तो मांसावर गुंडाळलेला निळा रुमाल बाहेर काढिला.

टार्लटन काळा ठिक्कर पडला. पण हार्डीची मुद्रा अगदीं बदलली नाहीं. "हा रुमाल तुझ्या ओळखीचा आहे काय?" "होय." "हा तुझा नव्हे काय?" "नव्हे." "तर मग तो कोणाचा हें तुला माहीत आहे काय?" असें विल्यम पॉवरनें विचारिलें. पण हार्डी कांहींच बोलला नाहीं.

मि. ट्रुमन ह्मणाले, "गृहस्थहो, तुह्मांला शिक्षा करावी अशी मला हौस नाहीं. परंतु मी जेव्हां शिक्षा करितों तेव्हां

ती अगदीं मनापासून करितों हें तुह्मांला माहीत आहेंच. आतां सर्वांत थोरापासून मी आरंभ करितों. हार्डीपासूनच आरंभ करून सर्वांना, हा रुमाल माझा आहे असें कोणीं ह्मणेपर्यंत, मी स्वतः चांगला खरपूस मार देतों." जो तो भयभीत होऊन एकमेकाकडे पाहून ह्मणूं लागला, "तो खचित माझा नव्हे किंवा माझ्या रुमालांपैकींही नव्हे." कारण हार्डी, लव्हिट व टार्लटन यांवांचून इतर कोणालाही तें गुह्य माहीत नव्हतें. "माझी छडी आण रे," असें मि. ट्रुमननें ह्मणतांच पॉवरनें त्यांस त्यांची छडी दिली. लव्हिटला अंतःकरणापासून अतोनात रडें कोसळलें. टार्लटनची मुद्रा काळी ठिक्कर पडून तो भिंतीशीं टेंकून उभा राहिला. हार्डी त्या छडीकडे एकसारखा टक लावून पाहूं लागला.

मि. ट्रुमन आपली छडी खालीं ठेवून ह्मणाले, "पण प्रथमतः मला पाहूं दे. कदाचित् दुसऱ्या तऱ्हेनेंही आह्मांला या रुमालाच्या मालकाचा पत्ता लागेल." त्यांनीं त्या रुमालाचे सर्व कोंपरे तपासून पाहिले. त्या रुमालाच्या फाटून बहुतेक चिंधऱ्या झाल्या होत्या; सुदैवानें खूण असलेला एक कोंपरा मात्र शाबूत होता.

मि. ट्रुमन मोठ्यानें ओरडून म्हणाले, "जे. टी." सर्वजण त्या अपराधी टार्लटनकडे पाहूं लागले. टार्लटन ह्यावेळीं अगदीं कोळशासारखा काळा ठिक्कर पडला. त्याचें सर्वांग लटलट कांपूं लागलें. तो मटकन् खालीं बसला व त्यानें दीनवाण्या स्वरानें मजवर दया करा म्हणून विनंति केली. तो म्हणाला, "गुरुजी, शपथपुरस्सर मी आपणास सर्व सांगतों. लव्हिटनें जर प्रथम मजजवळ फळांविषयीं

गोष्ट काढिली नसती तर तीं चोरण्याची कल्पना माझ्या मनांत कधींही आली नसती. कुत्र्याला विष घालण्याचें माझ्या मनांत प्रथम टॉमनेंच भरवून दिलें. टॉमनेंच तें मांस नेलें." त्यानें हार्डीला तो टॉम नव्हता काय म्हणून विचारिलें. कारण, त्याच्या वचनावर सर्वांचा विश्वास बसेल असें त्याला पक्कें माहीत होतें. मि. ट्रुमन जसजसे त्याच्याकडे येऊं लागले, तसतसा तो पुढें बोलूं लागला, "गुरुजी, अहो प्रिय गुरुजी, मला गय करा. मी तुमच्या पायां पडतों. मला या वेळीं गय करा. खरोखरी मी कांहीं एकटाच त्यांत नव्हतों. तुम्हीं मला शिक्षा करून इतरांस माझें उदाहरण घालून देणार नाहीं, अशी मला आशा आहे. त्यांना शिक्षा होईल त्याहून मला अधिक होणें हें मला फारच दुःसह होईल."

"मी तुला शिक्षा मुळींच करीत नाहीं." टार्लेटन उठून आपले डोळे पुशीत पुशीत ह्मणाला, "गुरुजी, तुमचे मजवर फार फार आभार आहेत." मि. ट्रुमन ह्मणाले, "माझे आभार मानण्याची तुला मुळींच जरूर नाहीं. हा आपला रुमाल घे. या खोलीबाहेर—ह्या घराबाहेर जा. मला फिरून तुझें तोंड दाखवूं नको."

त्याला बाहेर घालवून दिल्यानंतर मि. ट्रुमन ह्मणाले, "जर तो चांगला होईल अशी आशा असती, तर मी त्याला शिक्षाच केली असती; परंतु ती मला आशाच नाहीं. शिक्षा ही केवळ लोकांची सुधारणा करण्यासाठींच आहे. ज्यांना म्हणून स्वतःची सुधारण्याची आशा असते, त्यांनाच ती कशी भोगावी हें समजून येईल."

हें ऐकतांच प्रथमतः लव्हिट व लागलीच इतर अपराधी मंडळीही त्या रांगेमधून एकदम पुढें आली. व त्यांनीं आपला अपराध कबूल केला. त्यांनीं उघड बोलून दाखविलें कीं गुरुजींना योग्य वाटेल ती शिक्षा सोसण्यास आम्हीं तयार आहों.

तो म्हातारा मनुष्य म्हणाला, "महाराज, हीच शिक्षा त्यांना आतां पुरे आहे. त्यांना क्षमा करा."

हार्डीची कांहीं बोलण्याची इच्छा आहेशी दिसली. मि. ट्रुमन अपराधी विद्यार्थ्यांस म्हणाले, "तुह्मी क्षमा मागतां ह्मणून नव्हे. क्षमा करून तुह्मांला माझे उतराई करण्यामध्यें मला खरोखरीच आनंद व्हावा—परंतु तें न्यायाचें होणार नाहीं." ते हार्डीकडे बोट दाखवून म्हणाले, "हा पहा, हा एकटाच मुलगा बक्षिसाला लायक आहे. त्याला उत्तम बक्षीस म्हणून जें कांहीं द्यावयाचें तें त्याच्या मित्रांना क्षमा करावयाची हेंच."

हार्डीनें गुरुजींना नमस्कार केला. त्याचा चेहरा आनंदानें खुलूं लागला व त्याच्या बरोबर तेथें असलेल्या प्रत्येक मनुष्याला आनंद झाला.

लव्हिट मनांत म्हणाला, "खचित ही आज मला चांगलीच अद्दल घडली. ही मी आतां पुनः कधींही विसरणार नाहीं."

तो म्हातारा मनुष्य अडखळत अडखळत म्हणाला, "गृहस्थहो, मी जें कांहीं बोललों तें माझ्या फळांकरितां नव्हे." तो हार्डीस उद्देशून म्हणाला, "मुला, माझ्या कुत्र्याचा प्राण

वांचविल्याबद्दल मी तुझे फार आभार मानितों. जर तुझी इच्छा असेल, तर माझ्या या जुनाट वृक्षापासून तयार केलेला एखादा रोपा मी या खिडकी समोर त्या बांधावर आणून लावितों. मीच त्याला पाणी घालीन व माझ्या हातून होईल तितके दिवस मी स्वतःच त्याची निगा राखीन. ईश्वर तुझें कल्याण करो." त्यानें आपला कांपत असलेला हात हार्डीच्या डोक्यावर ठेवून त्यास आशीर्वाद दिला कीं, "ईश्वर तुला सुखी ठेवो! व माझी खात्री आहे कीं, तुझ्यासारख्या मुलांना तो खचित सुखी ठेवील."

समाप्त.

कोल्हापूर एथें मिशन छापखान्यांत छापिलें.

OPINIONS.

We have read this translation of Maria Edgeworth's tale "Tarlton" along with the original in English. It is idiomatic and free from any error and is written in simple ordinary style. As a moral book it is, we suppose, as useful as its original and deserves encouragement.

(Sd.) B. V. Khandekar B. A.

(Sd.) K. N. Pandit B. A. LL. B.

18*th. September,*
1892.
Kolhapur.

विक्रीस तयार.

किं. ट.ह.

पक्ष-पुष्प....	८४	८८६
मंजावाई....	८२	८८६

वरील दोन्ही नीतिबोधक पुस्तकें लहान मुलांच्या व मुलींच्या उपयोगासाठीं मुद्दाम तयार केलीं आहेत. त्यांच्या चांगुलपणाबद्दल विद्वानांनीं आपापले योग्य अभिप्राय दिले आहेत. हीं पुस्तकें प्रत्येक मनुष्यानें एकदां तरी वाचावींच. पुस्तकें खालील पत्त्यावर विकत मिळतील.

पत्ताः—विनायक दत्तात्रय भिलवडीकर,

कोल्हापूर.